# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### करड – चिपळूण रेल्वे मार्ग प्रकल्पाबाबत

**(१) २२६७ (१७-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोकणासह पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा आणि पर्यटक, प्रवासी, आरोग्य आणि व्यापार याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असणाऱ्या कराड चिपळूण या रेल्वेमार्ग प्रकल्पाला दिनांक ७ मार्च, २०१२ रोजी राज्य मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली असतानाही अद्यापपर्यंत या रेल्वेमार्गाच्या कामास सुरुवात झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १०३ किमी लांबीच्या रेल्वेमार्गासाठी राज्य आणि केंद्र शासनाचा प्रत्येकी ५० टक्के हिस्सा निश्चित करण्यात आला असून कोकण रेल्वे महामंडळाने केलेल्या सर्वेक्षणानुसार या रेल्वेप्रकल्पाची सुधारित अंदाजीत रक्कम ३,१९६ कोटी रुपये झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, सदरहू रेल्वे प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे आणि सदरहू रेल्वे प्रकल्प सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रताप सरनाईक (०१-०४-२०२६) :** (१), (२) व (३) रेल्वे हा विषय केंद्रीय सूचीमध्ये समाविष्ट असून महाराष्ट्र राज्यात रेल्वे मार्ग विकसित करण्याची प्राथमिक जबाबदारी केंद्र शासनाच्या रेल्वे मंत्रालयाची आहे.

करड-चिपळूण या नवीन रेल्वेलाईन प्रकल्पाला राज्य शासनाचा ५०% आर्थिक सहभाग देण्याबाबत दिनांक ०७ मार्च, २०१२ च्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार, हा रेल्वेमार्ग प्रकल्प केंद्र शासन ५०%, राज्य शासन ५०% अशा आर्थिक सहभागाद्वारे राबविण्यास दिनांक ७ जून, २०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली होती.

कोकण रेल्वे महामंडळाने तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सदर प्रकल्पाची सुधारित अंदाजित किंमत रुपये ३१९६ कोटी व आंतरिक परतावा दर (IRR) १४.०९ % इतका होता.कोकण रेल्वे महामंडळाने दिलेल्या प्रस्तावानुसार ७०:३० debt : equity ratio याप्रमाणे सदर प्रकल्पाची

अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. त्याप्रमाणे दिनांक १३/०९/२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यानुसार रुपये ६८.२० कोटी एवढा निधी कोकण रेल्वे महामंडळास equity ratio प्रमाणे अदा करण्यात आला. तथापि, कराड-चिपळूण हा रेल्वे प्रकल्प रेल्वे मंत्रालय पीपीपी तत्वावर राबविणार असल्याने प्रस्तुत प्रकल्पाच्या खर्चातील राज्य शासनाचा ५०% आर्थिक सहभाग देण्याबाबचा दिनांक ०७/०६/२०१२ रोजीचा शासन निर्णय दिनांक १९/०९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात आला आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १०/१२/२०१८ रोजी मा.केंद्रीय रेल्वे मंत्री यांना पत्र पाठविले असून, त्यामध्ये कराड-चिपळूण रेल्वे प्रकल्पासाठी केंद्र शासन व राज्य शासन ५०:५० या आर्थिक सहभागाद्वारे प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता द्यावी अशी विनंती केलेली आहे. त्याबाबत रेल्वे मंत्रालयाने अद्याप काही कळविलेले नाही.

केंद्र शासनाच्या रेल्वे विभागाकडुन प्राप्त झालेल्या माहितीनुसार कराड-चिपळूण या नवीन रेल्वे मार्गाच्या (११२ किमी) अंतिम स्थळ सर्वेक्षणाला रेल्वे बोर्डाने २०१७-१८ मध्ये मंजुरी दिली होती. सदर प्रकल्पाचा रुपये २९५३.८४ कोटी खर्च आणि परतावा दर (ROR)(-) ४.३७% असा DPR रेल्वे बोर्डाला दिनांक २८/१२/२०१८ रोजी सादर करण्यात आला होता.त्यानंतर, डीपीआरमध्ये सुधारणा करण्यात आली असून, सध्यस्थितीत सदर प्रकल्पाचा रुपये ३३१२.२५ कोटी खर्च आणि परतावा दर(आरओआर)(-) २.१२% असलेला DPR रेल्वे बोर्डाकडे दिनांक २४/१०/२०१९ रोजी पाठविला आहे. त्यास अद्याप मंजुरीची प्रतीक्षा आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लासलगाव व विंचूर (ता.निफाड जि.नाशिक) येथील नदी संवर्धन प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता मिळूनही कार्यारंभ आदेश निर्गमित केले नसल्याबाबत

**(२) २४११ (१७-०७-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव व विंचूर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत प्रस्तावांना दिनांक १६ मार्च २०२४ रोजी प्रशासकीय मान्यता मिळूनही माहे मे, २०२५ पर्यंत या कामांचे कार्यारंभ आदेश निर्गमित केलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,प्रश्न भाग (१) मधील विलंब आणि दिरंगाईबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ व दिनांक २ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे तक्रार केलेली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अहवालानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून ही कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०६-२०२६) :** (१) व (२) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांच्या दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या अहवालानुसार हे खरे असल्याचे कळविण्यात आले आहे.
(३) व (४) राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून प्राप्त मौजे विंचूर, ता.निफाड, जि.नाशिक येथील लोणगंगा नदीचे व मौजे लासलगांव, ता.निफाड, जि.नाशिक येथील शिव नदीचे पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धन करण्यासाठी अनुक्रमे एकूण रक्कम रूपये १३,६४,८८,९८९/- व रक्कम रूपये १३,१२,२३,८७८/- इतक्या रकमेच्या प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वा तत्सम संस्थेच्या तांत्रिक मान्यतेच्या अधीन राहून पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग शासन निर्णय क्र.रानयो-२०२४/प्र.क्र.७६ व ७७/आस्थापना-अ, दिनांक १६/०३/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व तत्सम यंत्रणेकडून तांत्रिक मान्यता घेऊन सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा व तांत्रिक मान्यतेसह सुधारित प्रस्ताव विभागास प्राप्त झाल्यानंतर निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येईल असे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस कळविण्यात आले होते.
• कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या अहवालानुसार तांत्रिक मान्यतेचे शुल्क ग्रामपंचायतीने टप्प्याटप्प्याने अदा केले असून त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. तसेच मौजे विंचूर, ता.निफाड, जि.नाशिक येथील लोणगंगा नदीचे व मौजे लासलगांव, ता.निफाड, जि.नाशिक येथील शिव नदीचे पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धन करण्याबाबत तांत्रिक मान्यतेसह सुधारित प्रस्ताव विभागास दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी प्राप्त झाला असून त्यानुषंगाने अंतिम प्रशासकीय मान्यता व निधी वितरणाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील दिव्यांगांकरिताच्या योजना व धोरणांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३) २५०२ (१७-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लाखों दिव्यांगांना केवळ रुपये १५००/- इतके मानधन दिले असून स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिव्यांगासाठी पाच टक्के निधी खर्च करावा असे शासनाचे आदेश असताना, शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी केली जात नसल्याचे तसेच दिव्यांगासाठी असलेल्या अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येत नसल्याचे दिनांक २९ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देशभरातील ८२ टक्के दिव्यांग व्यक्तींकडे कोणत्याही प्रकारचा विमा नसून ४२ टक्के दिव्यांगाना केंद्र शासनाचे प्रमुख आरोग्य योजना असणारे आयुष्यमान भारत पंतप्रधान जन आरोग्य योजनेबद्दल माहिती नसल्याचे मानवा अधिकारांसाठी लढणाऱ्या संघटनाने केलेल्या राष्ट्रीय सर्वेक्षणात

उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिव्यांग बांधवांच्या विविध समस्यांबाबत आयोजित केलेल्या आढावा बैठकी दरम्यान कालसुसंगत योजना, धोरणांची निर्मिती करावी व त्यात रोजगाराचे धोरण आणि घरकुलांसाठी स्वतंत्र योजना यांचा अंतर्भाव करण्याचे निदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, दिव्यांगासाठी राजस्थान, केरळ राज्यासह इतर अनेक राज्यात देण्यात येत असलेल्या धर्तीवर राज्यातील दिव्यांगांना वाढीव मानधन देण्यात यावे व स्थानिक स्वराज्य संस्थांवर ५ टक्के निधीचा खर्च करण्याचे बंधन घालण्यात यावे, अशी मागणी दिव्यांगाकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार सदरहू योजना व धोरणांची अंमलबजावणी करण्याबाबत तसेच राज्यातील दिव्यांग व्यक्तींना विमा, आरोग्याच्या सेवा, विमा कवच देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (३१-०३-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.

शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येते. विभागाच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेमधून रक्कम रुपये २५००/- इतके मानधन दिले जाते.

शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५ जून, २०१८ व नगरविकास विभागांच्या शासन निर्णय दिनांक १० मे, २०१८ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांना दिव्यांगासाठी ५% निधी खर्च करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच सदर ५ % निधी संपूर्णपणे त्याच आर्थिक वर्षात खर्च करण्याबाबत सचिव, दिव्यांग सक्षमीकरण यांच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या अर्धशासकीय पत्र आणि दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सुचना देण्यात आल्या आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
सन २०२५ मध्ये National Centre for Promotion of Employment for Disabled People (NCPEDP) यांनी केलेल्या “Ayushman for all” या सर्वेक्षणात असे सदर बाब नमुद आहे.
(३) होय, हे खरे आहे.
“दिव्यांगांच्या विविध प्रश्नांबाबत” दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी विषयानुरूप निर्देश दिले आहेत.
(४) अंशतः खरे आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून दिनांक २०/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येते. सदर योजनेमधून दिव्यांग लाभार्थ्यांना रक्कम रुपये १५००/- इतके मानधन दिले जात होते. परंतु, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन

निर्णयान्वये, दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रुपये १५००/- वरुन रुपये २५००/- इतकी वाढ करण्यात आलेली असून सदर वाढ माहे ऑक्टोंबर, २०२५ पासून डी.बी.टी पोर्टलद्वारे लाभार्थ्यांना देण्यात येत आहे.

तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांवर ५% टक्के निधी दिव्यांगांसाठी खर्च करण्याचे बंधन घालण्यात यावे अशी मागणी करण्यात आल्याचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही. तथापि, शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५ जून, २०१८ व २६ मे, २०२० आणि नगरविकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७, दिनांक १० मे, २०१८, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांना दिव्यांगासाठी ५% निधी खर्च करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) वैश्विक ओळखपत्र (UDID) कार्डधारक दिव्यांगांसाठी आयुष्मान कार्ड निर्माण करणे व एकत्रित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना याबाबतची माहिती देणे यासाठी विशेष मोहिम राबविणेबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व सर्व आयुक्त महानगरपालिका यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांचे स्तरावरून सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील कृषी पंपांच्या ऊर्जीकरणाचे कामाबाबत

**(४) २७६५ (१७-०७-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला ग्रामीण (ता.मूर्तिजापूर, जि.अकोला) कार्यालयाअंतर्गत येत असलेल्या महावितरणच्या कृषी पंपांच्या ऊर्जीकरणाचे एकच काम दोन वेगवेगळ्या कंत्राटदारांना दिले असल्याचे बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कृषी पंपांच्या ऊर्जीकरणाचे व्यवहारामध्ये अनियमितता झाली असून संबंधित कंत्राटदाराने थेट महावितरण व्यवस्थापकीय संचालक मुंबई यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने एकाच कामासाठी दोन कंत्राटदार नेमल्या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अकोला जिल्ह्याअंतर्गत सद्य:स्थितीत पारंपारिक विद्युत पुरवठा देण्याएवजी मागेल त्याला सौर कृषीपंप या योजनेंतर्गत सौर कृषीपंप आस्थापित करण्यात येत आहेत. सदर सौर कृषीपंप आस्थापित करण्याकरीता पुरवठादारांचे निवड ही लाभार्थी हे पोर्टलमार्फत करत असतात, त्यामुळे एकाच कृषीपंप आस्थापित करण्याच्या कामांबाबत एका लाभार्थ्यांच्या संदर्भात एकाच कामाची दोन वेगवेगळ्या

कंत्राटदारांकडून अंमलबजावणी होण्याची शक्यता उपलब्ध प्रक्रियेअंतर्गत उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सीमा तपासणी नाके बंद करण्याबाबत

**(५) २८७० (१७-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सीमा तपासणी नाके पूर्णपणे बंद करण्याबाबत सन २०१७ मध्ये केंद्र शासनाने आदेश दिले असताना सुद्धा राज्यातील सीमा तपासणी नाके आजतागायत सुरु असून एक सेवा निवृत्त अधिकारी बेकायदेशीरपणे वसुली करत असल्याने भ्रष्ट अधिकाऱ्याविरुध्द कारवाई होणे संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०८/०४/२०२५ रोजी वा त्यासुमारास मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, परिवहन मंत्री, परिवहन आयुक्त यांचेकडे निवेदन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मोटार परिवहन व सिमा शुल्क विभागाच्या २२ चौक्या बंद करण्याच्या निर्णयामुळे ५०४ कोटी रुपयांची नुकसान भरपाई शासनाकडून संबंधित कंपनीला देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने केंद्र शासनाचे निर्देशानुसार सीमा तपासणी नाके बंद करणे तसेच या भ्रष्ट सेवा निवृत्त अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१२-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राज्यातील मोटार वाहन विभागातील सीमा तपासणी नाके बंद करण्याच्या निर्णयामुळे नुकसान भरपाई अदा करण्याचा कोणताही निर्णय अद्याप घेण्यात आलेला नसून राज्यातील सीमा तपासणी नाके बंद करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

तसेच, सन २०२५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील विधानपरिषदेतील आश्वासन क्रमांक २८८ च्या अनुषंगाने सेवानिवृत्त उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करण्यास मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याबाबत

**(६) २९२८ (१७-०७-२०२५) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध महाविद्यालयामध्ये सन २०१७-१८, २०२१-२२ व २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये विमुक्त जाती भटक्या जमाती व नागरिकांचा मागास प्रवर्ग वर्गातील पात्र विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती महाविद्यालयास वर्ग करणेत आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर शिष्यवृत्ती वितरणासाठी आयुक्त, समाजकल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महा डीबीटी (Mahadbt-IT) मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आलेली असून अद्यापपर्यंत महा डीबीटी (Mahadbt-IT)मुंबई यांचेकडून संबंधित महाविद्यालयास अद्यापपर्यंत शिष्यवृत्ती अदा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पात्र विद्याथ्यांची शिष्यवृत्ती वेळेवर वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१५-०६-२०२६) :** (१), (२) व (३) सन २०११-१२ ते २०१६-१७ या कालावधीतील ऑनलाईन पध्दतीने महाईस्कॉल पोर्टलवर नोंद झालेल्या तसेच सन २०१७-१८ या वर्षातील ऑफलाईन पध्दतीने स्वीकारण्यात आलेल्या विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती व फ्रीशिप योजनेंतर्गत नोंदणीकृत प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शक सूचना, शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांचे कार्यालयाकडून प्राप्त होणारे अन्वेषण प्रस्ताव शासन स्तरावरुन तपासून निधी वितरीत केला जातो.
तसेच, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीतील प्रलंबित शिष्यवृत्तीच्या रक्कमांबाबत (Reconciliation) महाआयटी मुंबई यांनी संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना कळविल्यानुसार संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे कार्यालयास दिनांक ३०/०४/२०२६ च्या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत आवास योजनेंतर्गत निधी पूर्णत: खर्च न केल्याबाबत

**(७) ३००३ (१७-०७-२०२५) श्री.संदीप जोशी, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत आवास योजनेंतर्गत भटक्या व विमुक्त समाजातील नागरीकांना शासनातर्फे घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी देण्यात आलेला कोट्यवधी रुपयाचा निधी वेळेवर न वापरल्याने शासनाकडे तीन कोटी रुपये परत करण्यात आले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात ढिवर समाज संघटनेने समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यांना निवेदन देवून चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यशवंतराव चव्हाण मुक्त आवास योजनेंतर्गत दिलेली निधी पूर्णत: खर्च न होण्यामागील कारणे काय आहेत तसेच निधी पूर्ण खर्च न करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१५-०६-२०२६) :** (१), (२) व (३) यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत मंजूर घरकुलांसाठी दिनांक ३१/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत रुपये ३५.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला होता.त्यापैकी सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण, भंडारा यांना वितरीत केलेला रुपये २,११,५०,०००/- इतका निधी शासनाकडे समर्पित करण्यात आला आहे. यानुषंगाने दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, भंडारा यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला असता, प्राप्त खुलाशानुसार BDS प्रणालीवरील तांत्रिक अडचणींमुळे निधी आहरित करण्यासाठी आवश्यक प्राधिकार पत्र तयार न झाल्याने सदरहू निधी शासन खाती समर्पित करण्यात आला आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनांकरीता वितरीत निधी तांत्रिक अथवा इतर अडचणींमुळे अशाप्रकारे समर्पित होऊ नये याकरीता दिनांक २१/०८/२०२५ च्या शासन निर्णयान्वये योजनेचे “नियंत्रक” आणि “आहरण व संवितरण अधिकारी” यांमध्ये बदल करुन संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना “नियंत्रक अधिकारी” आणि उपसंचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वीज दरात समानता आणण्याबाबत

**(८) ३१६१ (१७-०७-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज कायद्यातील आणि एमईआरसीच्या विनियमातील तरतूदीनुसार वीजनिर्मिती, वीजवहन आणि वीज वितरण कंपन्यांना आवश्यक असलेल्या महसूली गरजेचा प्रस्ताव वीज आयोगाकडून मंजूर करून घेणे बंधनकारक असून त्यानुषंगाने सन २०२५-२०२६ ते २०२९-२०३० पर्यंतच्या बहुवार्षिक महसुली गरजेचा प्रस्ताव मुंबई शहर व मुंबई उपनगरातील वीज कंपन्यांनी वीज आयोगाला सादर केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास अदाणी, टाटा व बेस्ट या वीज कंपन्यांनी अनुक्रमे वार्षिक सुमारे ११ हजार कोटी रूपये, ५ हजार कोटी तर ४ हजार ६०० कोटी रूपयांच्या महसुलाची मागणी केली असून प्रस्तावाच्या अनुषंगाने वीज आयोगाने ग्राहकांकडून १० फेब्रुवारी, २०२५ पर्यंत या प्रस्तावरील सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत ०-१०० युनिट करीता मुंबई शहर व मुंबई उपनगरात अदाणी, टाटा व बेस्ट या वीज कंपन्यांकडून पुढीलप्रमाणे अनुक्रमे ३.८० रूपये, २.१८ रूपये तर १.८७ रूपये असे दर आकारण्यात येतात, या कंपन्यांच्या दरामध्ये साधर्म्य नसण्याची कारणे काय आहेत व या कंपन्यांकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांना मंजूरी देताना या वीजदरांमध्ये समानता आणण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) मा.वीज नियामक आयोगास वीजदर निश्चित करणाचे अधिकार आहेत. त्यानुसार वीज नियामक आयोगाने लागू केलेले वीजदर स्लॅब प्रणालीवर आधारित असून, सदर स्लॅब प्रणाली ग्राहक वर्गवारीसाठी लागू नाही.

मुंबईतील सर्व वितरण कंपन्यांमध्ये एकसमान वीज दर राखणे शक्य नाही. कारण प्रत्येक कंपनीची दर रचना ही तिच्या सरासरी पुरवठा खर्चावर (Average Cost of Supply) आधारित असून, तो प्रत्येक कंपनीनुसार वेगवेगळा असतो. सरासरी पुरवठा खर्च हा वीज खरेदी खर्च, संचालन आणि देखभाल (O& M) खर्च, भांडवली गुंतवणूक, सेवा खर्च इत्यादी अनेक घटकांवर अवलंबून असतो. हा सरासरी पुरवठा खर्च वसूल करण्यासाठी दरांची रचना केली जाते आणि ते प्रस्तावित केले जातात.
प्रत्येक वितरण परवानाधारकासाठी पुरवठ्याचा सरासरी खर्च भिन्न असल्यामुळे, त्यांच्या दर रचनांमध्येही फरक असतो. याव्यतिरिक्त, विशिष्ट ग्राहक श्रेणींना लागू होणारे दर हे क्रॉस-सबसिडीच्या पातळीवर आणि प्रत्येक वितरण परवानाधारकाच्या ग्राहक मिश्रणावर अवलंबून असतात. वितरण कंपन्यांमध्ये निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक असे भिन्न ग्राहक मिश्रण असल्यामुळे, ०-१०० युनिट्सच्या निवासी श्रेणीसाठीचा दर देखील प्रत्येक परवानाधारकानुसार वेगळा असतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोरेगाव (मुंबई) येथील चित्रनगरीच्या जागेवर अतिक्रमण करण्यात आल्याबाबत

**(९) ३३७७ (१७-०७-२०२५) श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (मुंबई) येथील चित्रनगरीच्या जागेवर अतिक्रमण करण्यात असून याबाबत पर्यावरण प्रेमी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री महोदय यांच्याकडे तक्रार दाखल केली असल्याची बाब माहे मे २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (१८-०५-२०२६) :** (१) कार्यकारी संपादक मुंबई संध्या वृत्तपत्र समूह, मुंबई यांनी मा.मुख्य मंत्री महोदय व मा.मंत्री (सां.का.) यांना माहे नोव्हें, २०२५ मध्ये दिलेली अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव (पूर्व) महाराष्ट्र यांना मात्र अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झालेली नाही.महामंडळाच्या जागेतील १५,२८६ चौरस फूट इतका भूखंड प्रशासकीय मंजूरी अंती मे. मस्तान क्रेन यांना दिनांक ०२/०३/२०२४ ते ०२/०२/२०२५ या कालावधीकरीता भाडे तत्वावर दिलेला होते. सदर कालावधी संपुष्टात आल्यानंतर सुधारित भाडेदराप्रमाणे दिनांक ०३/०२/२०२५ ते ०१/०३/२०२६ या कालावधीकरीता प्रशासकीय मंजूरीअंती मे. मस्तान क्रेन सर्विसेस या संस्थेस भाडे तत्वावर देण्यात आला

होता.तथापि, सदर सुधारित दर सदर संस्थेस मंजूर नसल्याने, माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये सदर भूखंडाचा ताबा महामंडळाने घेतलेला आहे. सदर भूखंड हा मोकळा भूखंड असून, सदर ठिकाणी कुठलीही झाडे तोडलेली नाहीत. गोरेगाव मुंलुंड लिंक रोड मुळे बाधित ३४ झोपड्यांचे स्थलांतर करण्यासाठी महामंडळाने नागरमोडी पाडा येथील भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेला आहे. सदर नागरमोडी पाडा येथील भूखंडावर अतिक्रमण केलेले मे. मस्तान क्रेन सर्विसेस या संस्थेस तसेच अनधिकृत गोदामांना दिनांक ०१/०१/२०२६ रोजी नोटिसा बजाविण्यात आलेली होती. सद्य:स्थितीत मे. मस्तान क्रेन सर्विसेस या संस्थेचे गॅरेज व क्रेन इतरत्र महामंडळाच्या हद्दीतच हलविण्यात आलेले आहेत. त्याकरीता सदरसंस्थेकडून महामंडळाच्या निश्चित दर रुपये ०.५५ प्रति चौरस फूट प्रतिदिन याप्रमाणे भाडे आकारणी करणे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## मुरबाड (जि.ठाणे) येथील सिध्दगड किल्ल्याचे जतन व संवर्धन करण्याबाबत

**(१०) ३५११ (१८-०७-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवशाहीचा साक्षीदार असलेल्या सिध्दगड किल्ल्याचे जतन व संवर्धन शासनाने करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदनाद्वारे दिनांक ८ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०७-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर स्मारक हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची तसेच स्मारकाच्या जतन दुरूस्ती व संवर्धनाच्या अनुषंगाने संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये, संचालनालयामार्फत कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल तालुक्यातील गावांमधील वीज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत

**(११) ४४५७ (१८-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेएनपीटी बंदर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवीन विस्तारीत तळोजा औद्योगिक क्षेत्रामुळे पनवेल हे नवीन उद्योगकेंद्र असताना पनवेल येथील ५० गावे आणि २५ वाड्या- पाड्यावर दिवसातून दोन ते तीन वेळा वीज खंडीत होत असल्याची बाब माहे, मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेरे येथे गत १३ वर्षामध्ये वीज महावितरण कंपनीने उपकेंद्र उभारणीचे काम पूर्ण केले

नसल्यामुळे वीजपुरवठा सुरळीत होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी १३ वर्षापासून नेरे उपकेंद्राचे प्रलंबित असलेले नेरे उपकेंद्राचे काम जलदतगतीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) महावितरण कंपनीच्या पनवेल शहर विभागाकरीता नवीन वीज वितरण प्रणाली निर्माण करण्यासाठी रुपये ६४.५७९ कोटी इतक्या रक्कमेचे कंत्राट मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर यांना दिनांक २२/११/२०१३ नुसार देण्यात आले होते. त्यामध्ये नेरे उपकेंद्र ३३/११ के.व्ही., १x१० एम.व्ही.ए. चे रोहित्र देखील समाविष्ट केले होते. सदर कंत्राटदारास कामे करीत असताना काही स्थानिक लोकांच्या विरोधामुळे काम करण्यास कंत्राटदाराने असमर्थता दाखवली. त्यामुळे दिनांक ०४/०९/२०१५ अन्वये त्यांचे कंत्राट अंशतः रद्द करण्यात आले.

त्यानंतर, पुनश्च निविदा प्रक्रिया अवलंबून मे. सुदर्शन इलेक्ट्रिकल इंजिनिअर वर्क्स यांना दिनांक २८/०२/२०१९ रोजी कंत्राट देण्यात आले. त्यांनी नेरे उपकेंद्राचे काम केले नसल्यामुळे दिनांक ११/०७/२०२२ रोजी त्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले. सदर उपकेंद्राची रुपये ७.१९४ कोटी इतक्या रक्कमेची पुन्हा निविदा काढून, सदर काम मे.एस.टी. इलेक्ट्रिकल्स यांना दिनांक ३०/१०/२०२३ रोजीच्या करारानुसार देण्यात आले आहे.
मे.एस.टी. इलेक्ट्रिकल्सला स्थानिक रहिवाश्यांकडून विरोध झाल्याने, सदर एजन्सीला पोलीस संरक्षण देऊन भूमीगत वीज वाहिनी टाकण्याचे काम करावे लागले. जून २०२४ मध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे, उपकेंद्राच्या जागेवर पाणी साचले होते. त्यामुळे उपकेंद्राच्या फाउंडेशन स्ट्रक्चरचे काम डिसेंबर, २०२४ पर्यंत सुरु करता आले नाही. ह्या सर्व बाबीमुळे सदर भूमीगत वीज वाहिनीचे काम करण्यासाठी विलंब झाला आहे.

नेरे उपकेंद्राचे काम करणाऱ्या ठेकेदारास, सदर उपकेंद्र युध्दपातळीवर तात्काळ सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले होते. सदर ३३/२२ केव्ही पॉवर ट्रान्सफॉर्मर परंपरागत नसल्यामुळे, ट्रान्सफॉर्मरची स्टेज तपासणी टेस्ला कंपनीत, भोपाळ येथे चालु असून, तपासणीनंतर पॉवर ट्रान्सफॉर्मर नेरे येथे प्रस्थापित केले जाईल. या व्यतिरिक्त नेरे उपकेंद्राचे काम मे.एस.टी. इलेक्ट्रिकल्स यांनी पूर्ण करून, सदरील ग्राहकांची वीज पुरवठ्याबाबतची तक्रार लक्षात घेऊन, नेरे ३३/२२ केव्ही उपकेंद्र येथून एका वाहिनीच्या ठिकाणी, नविन तीन २२ केव्ही (२२ केव्ही नेरे, २२ केव्ही दूंद्रे व २२ केव्ही वाझे) वीजवाहिन्या दिनांक ०७/११/२०२५ रोजी कार्यान्वित करून सदर उपकेंद्र विद्युतभारीत करण्यात आले आहे. या उपकेंद्रामुळे नेरे व इतर परिसरामध्ये वीज पुरवठा करणाऱ्या एका वीजवाहिनीचे विभाजन तीन वीज वाहिन्यांमध्ये करण्यात आले आहे. त्यामुळे सदर परिसरातील ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा करण्यासाठी मदत होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

## नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळा दरम्यान शहराला अखंड वीजपुरवठा करण्याकरिता नव्या उपकेंद्रांची उभारणी करण्यात येणार असल्याबाबत

**(१२) ४६४५ (२५-०८-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळयाच्या अनुषंगाने शासनाच्या विविध विभागांनी कामे हाती घेतली असून शहराला अखंड वीजपुरवठा करण्याच्या उद्देशाने ऊर्जा विभागाकडून महावितरण पाच नव्या उपकेंद्राची उभारणी करणार असल्याचे माहे एप्रिल,२०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपकेंद्रासाठी ५०० एकर जागेवर नाशिक महानगरपालिका साधनसामग्रीची निर्मिती करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंहस्थ कुंभमेळा काळात विजेची निकड दूर करण्याच्या अनुषंगाने महावितरण पाच नव्या उपकेंद्राची उभारणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सिंहस्थ कुंभमेळा २०२६-२७ च्या प्रस्तावित पायाभूत आराखड्यातील नवीन ३३/११ के.व्ही. गोदा पार्क, ३३/११ के.व्ही. नांदुर-मानुर, ३३/११ के.व्ही. तळवाडे व ३३/११ के.व्ही. भद्रकाली जीआयएस याठिकाणी नवीन ४ उपकेंद्राची उभारणी महावितरण कंपनीकडून करण्यात येणार आहे.

(२) हे खरे नाही.

महावितरण कंपनीमार्फत सदरील ४ उपकेंद्रांसाठी एकूण ११२०० चौ. मी. जागेची मागणी नाशिक महानगरपालिका व जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे करण्यात आली आहे.

(३) महावितरण कंपनीमार्फत सदरील ४ उपकेद्रांची निविदा प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१३) ४८२१ (१४-१२-२०२५) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतीमधील वाहतूकींची समस्या सोडविण्यासाठी '' मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेस'' दिनांक ९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान सहयाद्री अतिथीगृह, मुंबई येथे झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व किती निधीची तरतूद करण्यात आली आहे तसेच या पूर्वी रोजगार हमी योजना विभागामार्फत अनेक पाणंद रस्ते मंजूर केले असून यासाठीच्या निधी वितरणाबाबत कोणते निर्णय घेण्यात आहेत,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०७-०४-२०२६) :** (१) होय हे खरे आहे,

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. लवेसू-२०२५/प्र.क्र.४५८/भूमापन दिनांक ०१/०८/२०२५ अन्वये शेत/पाणंद रस्ते यांचे मजबुतीकरण करण्यासंदर्भात समग्र योजना तयार करण्यासाठी मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठका दिनांक ०६/०८/२०२५, दिनांक ०९/०९/२०२५ व दिनांक १५/१०/२०२५ रोजी पार पडल्या. समितीच्या शिफारसींना अनुसरुन मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक ०७/१२/२०२५ च्या बैठकीत सविस्तर प्रस्ताव मांडण्यात आला होता.सदर प्रस्तावास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिल्यानंतर दिनांक १४/१२/२०२५ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील ग्रामिण भागातील शेत/पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी महसूल व वन विभागामार्फत "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" सुरु करुन ती राबवण्याकरीता सोपी व सुलभ कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

(२) मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना ही पूर्णपणे यंत्रसामुग्रीचा वापर करुन राबविली जाणारी स्वतंत्र्य योजना आहे. या योजनेंतर्गत रस्त्यासाठी लागणाऱ्या गौण खनिजावर स्वामित्व शुल्क माफ असणार आहे. मोजणी फी व पोलीस बंदोबस्त शुल्कही आकारले जाणार नाही. या योजनेच्या प्रभावी अंबलबजावणीसाठी राज्यस्तरावर मा.मंत्री (महसूल), जिल्हास्तरावर मा.पालकमंत्री आणि विधानसभा क्षेत्रस्तरावर मा.विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत असणार आहेत.

(३) मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेसाठी स्वतंत्र्य निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक: लवेसू २०२५/प्र.क्र.०२(ई-१४८९४९०)/पाणंद रस्ते दिनांक २३/०२/२०२६ अन्वये "मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना (कार्यक्रम)(२५१५२७८२)" या स्वतंत्र्य लेखाशिर्षाला मान्यता देण्यात आली आहे. तसेच या योजनेकरीता सन २०२६ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये रुपये १००० कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत राज्य रोहयो अंतर्गत पुरक कुशल अनुदान उपलब्ध करण्यात येते. त्यानुसार लेखाशीर्ष २५०५ए०६७, ३१ (सहायक अनुदाने-वेतनेत्तर) अंतर्गत पुरक कुशल अनुदानाकरीता चालु आर्थिक वर्षात ५०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. सदर अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी रुपये १७५ कोटी रोहयो प्रभागास उपलब्ध झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील अरबी समुद्राच्या प्रदुषणामध्ये वाढ होत असल्याबाबत

**(१४) ५५२४ (१४-१२-२०२५) श्रीमती चित्रा वाघ, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील अरबी समुद्रामध्ये १३०० द.ल.लिटर दूषित सांडपाणी सोडले जात असल्याने अरबी समुद्रामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दूषित पाण्यामुळे समुद्री जीवसृष्टीक, खारपट्टी आणि किनारपट्टीचे आरोग्य व मुंबईकरांच्या आरोग्यावरही थेट परिणाम होत असून समुद्रातील प्रदूषणामुळे किनारपट्टीवर दुर्गंधी पसरुन

जलजण्य आजाराचा प्रादुर्भाव वाढत असल्याने स्थानिक प्रशासन व प्रदूषण विभागाने याबाबत कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अरबी समुद्राचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २६३२ दशलक्ष लिटर प्रतिदिन घरगुती सांडपाणी निर्माण होत असून त्यापैकी १५६१.२५ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते. उर्वरीत अप्रक्रियाकृत व काही प्रमाणात बायोरेमीडेशन तंत्रज्ञान प्रक्रियेव्दारे अंशत: प्रक्रिया केलेले सांडपाणी समुद्रात सोडण्यात येते.
(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार मुंबईतील दूषित पाण्यामुळे समुद्री जीवसृष्टी, खारफुटी (मॅन्ग्रोव्ह) यावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले नसल्याचे कळविले आहे. तसेच मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार दूषित पाण्यामुळे नागरीकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे निदर्शनास आले नसल्याचे कळविले आहे.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कार्यान्वित असलेल्या सात सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांच्या प्रक्रियाकृत सांडपाण्याचे पृथ्थकरण केले जाते. सदर पृथ्थकरण अहवालानुसार जैविक प्राणवायू मागणी (बीओडी) व स्थगित घनांश (एसएस) ची मूल्ये राष्ट्रीय मानकांपेक्षा काही प्रमाणात वाढल्याचे निदर्शनास आले होते. सबब, सदर मानकांची पूर्तता न झाल्याने सदर सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांना नोटीस बजावली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सद्य:स्थितीत कार्यान्वित असलेल्या सहा सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प अद्ययावत करण्याचे तसेच धारावी येथे नवीन सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उध्दभवत नाही.

---

## अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांसाठी स्वतंत्र बचाव केंद्र उभारण्याबाबत

**(१५) ६५८७ (२५-०३-२०२६) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर जिल्ह्यात स्वतंत्र ‘रेस्क्यू सेंटर’ नसल्याने जेरबंद केलेल्या सुमारे ४० बिबट्यांना वनविभागाच्या नर्सरीमध्ये पिंजऱ्यात ठेवावे लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली असून बिबट्यांच्या देखभालीचा वाढता खर्च आणि त्यांना ठेवण्यासाठी हक्काची जागा नसल्याने नवीन मोहिमांसाठी पिंजरे अपुरे पडत असून त्याचा शासनाच्या निधीवर अतिरिक्त ताण येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पकडलेल्या बिबट्यांच्या स्थलांतरासाठी आवश्यक परवानगी मिळण्यास विलंब होत असल्याने वन विभागासमोर व्यवस्थापनाचा आणि सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून जिल्ह्यामधील

बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेता स्वतंत्र बचाव केंद्र नसल्याने वनविभागाची कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही व उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२७-०४-२०२६) :** (१) अहिल्यानगर वनविभागामध्ये विविध वनपरिक्षेत्रात मानवावरील हल्ल्यास कारणीभूत असणाऱ्या व गावामध्ये तसेच लोकवस्तीमध्ये वारंवार येत असणाऱ्या वनेत्तर क्षेत्रामधून मानवी जीवितास धोकादायक ठरलेल्या एकूण २३ बिबट्यास रेस्क्यु करण्यात आलेले होते. अहिल्यानगर वनविभागात सद्य:स्थितीत ६२५ बिबट पिंजरे उपलब्ध असून पिंजऱ्याची कोणत्याही प्रकारची कमतरता नाही. परंतु, सद्य:स्थितीत अहिल्यानगर वन विभागामध्ये बिबट बचाव केंद्र उपलब्ध नाही.

अहिल्यानगर जिल्ह्यातील मानवी हल्ल्यात सहभागी असलेले बिबट कायमस्वरुपी बंदिस्त करण्यासाठी तसेच विविध कारणांमुळे जखमी असलेले बिबट बंदिस्त करण्यासाठी तसेच बचाव केलेले बिबट ठेवण्यासाठी तसेच विविध ठिकाणी मादीने सोडलेली पिल्ले ठेवण्यासाठी बारागाव नांदुर येथे TTC च्या शेजारी बिबट रेस्क्यु सेंटर स्थापन करण्यासाठी प्रस्ताव Central Zoo Authority, New Delhi यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्ताव मंजूर झाल्यास २०० बिबट बंदिस्त ठेवण्याची क्षमता असणार आहे. त्यामुळे अहिल्यानगर वनविभागामध्ये पकडलेल्या बिबट्यांना ठेवण्याचा प्रश्न मार्गी लागेल. तसेच उपवनसंरक्षक, अहिल्यानगर यांनी दिनांक ६/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा नियोजन समिती, अहिल्यानगर यांना सदर रेस्क्यु करण्यात आलेले बिबट यांना खाद्य पुरवठा करण्याकरीता निधी मागणी केलेली आहे.
(२) व (३) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समितीच्या दिनांक ०८/०१/२०२६ रोजी आयोजित बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने दिनांक २९/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये ज्या बिबट्यांची मानवांवर हल्ला करण्याची पार्श्वभूमी असलेल्या बिबट्यास निसर्ग मुक्त न करता कायमस्वरुपी बंदिस्त ठेवण्याबाबत समितीने शिफारस केलेली होती.

सदर शिफारशीच्या अनुषंगाने अहिल्यानगर वनविभागाकडून २ बिबट्यास बिबट निवारा केंद्र माणिकडोह ता.जुन्नर, जि.पुणे या ठिकाणी यापूर्वीच स्थलांतरीत केले होते. तसेच माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथील २० बिबटे वनतारा येथे स्थलांतरीत केले असल्याने अहिल्यानगर वनविभागाकडील २० बिबट्यास दिनांक ७ मार्च, २०२६ रोजी बिबट निवारा केंद्र माणिकडोह, ता.जुन्नर, जि.पुणे येथे सुरक्षितरित्या स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. तसेच एका बिबट्यास निसर्गमुक्त करण्यात आलेले आहे.

अहिल्यानगर वनविभागात रेस्क्यु केलेले २३ बिबट सुरक्षितपणे माणिकडोह रेस्क्यु सेंटर येथे स्थानांतरीत केले आहेत.

त्याचबरोबर मौजे-निझर्णेश्वर, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर या ठिकाणी बिबट सफारी कम मिनी झू सुरू करणे, मौजे-दुधेश्वर, ता.संगमनेर,जि.अहिल्यानगर येथे बिबट सफारी केंद्राची तसेच मौजे-बेलवंडी, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर येथे बिबट सफारी व २०० क्षमतेच्या बिबट रेस्क्यु केंद्राची स्थापना करण्याचे

नियोजित आहे. त्यामुळे भविष्यात अहिल्यानगर वनविभागात मानव-बिबट संघर्षाच्या घटना कमी होण्यास मदत होणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## येवला आणि निफाड तालुक्यातील (जि.नाशिक) ११२ गावांचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत समावेश करण्याबाबत

**(१६) ६६०६ (२५-०३-२०२६) श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील गावांमध्ये क्षारयुक्त पाण्याने नापीक बनलेल्या जमीनींची सुधारणा करण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी या योजनेमधून पथदर्शी प्रकल्प राबविण्याची लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मा.मंत्री,कृषी तसेच विभागीय कृषी सहसंचालक नाशिक यांचेकडे मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामध्ये येवला व निफाड तालुक्यातील उर्वरित ११२ गावांचा समावेश करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०२५ आणि दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मा.कृषी मंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्षारयुक्त पाण्याने नापीक बनलेल्या जमीनींची सुधारणा करण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेतून पथदर्शी प्रकल्प राबविण्याकरीता तसेच हवामान बदलास संवेदनशील असलेल्या येवला आणि निफाड तालुक्यातील (जि.नाशिक) ११२ गावांचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत समावेश करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०८-०६-२०२६) :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार प्रकल्पांतर्गत सलग समतल चर, खोल सलग समतल चर, शेत बांधबंदिस्ती, ढाळीचे बांध, नवीन भात खाचरे, जुनी भात खाचर दुरुस्ती, गॅबियन बंधारे, संयुक्त गॅबियन बंधारे, माती नाला बांध, सिमेंट नाला बांध, सिमेंट नाला बांध दुरुस्ती, अस्तित्वातील सिमेंट नाला बांधातील गाळ काढणे, शेततळे इत्यादी मृद व जलसंधारणाची कामे प्रकल्प गावांमध्ये राबविण्यात येत आहेत. कृषी व पदुम विभागाच्या दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ शासन निर्णयाद्वारे प्रकल्पाच्या २१ जिह्यांतील ७२०१ गावांच्या निवडीस मान्यता दिलेली आहे. नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यातील ३३ गावे व निफ़ाड तालुक्यातील ३६ गावे यांसह नाशिक जिल्ह्यातील ६७४ गावांचा समावेश प्रकल्पात करण्यात आलेला आहे. प्रकल्पाची जागतिक बँकेच्या धोरण व निकषांनुसार अंमलबजावणी करण्यात येत असल्याने प्रकल्पाकरीता निश्चित केलेली धोरणे विचारात घेता, प्रकल्पाच्या टप्पा-२ मध्ये अधिक जिल्हे, तालुके व गावे समाविष्ट करण्यावर राज्य शासनास मर्यादा आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुण्यातील नामांकित रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टकडून वन्यजीव संरक्षण कायद्याचे अन्य काही कायद्यांचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(१७) ६६४१ (२५-०३-२०२६) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वन्यजीवांची सुटका, उपचार, पुनर्वसनासाठी कार्यरत असलेल्या पुण्यातील एका नामांकित रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टकडून वन्यजीव संरक्षण कायद्यासह अन्य काही कायद्यांचे उल्लंघन होत असल्याच्या असंख्य तक्रारी प्राणीप्रेमींनी वन विभागाकडे केल्या असल्याची बाब दिनांक २५ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वन विभागाच्या नागपूर स्थित मुख्य कार्यालयाने चौकशी करून अहवाल सादर करण्याचा आदेश पुणे येथील वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालयाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे येथील वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालयाने याबाबतचा चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे काय, अहवालाचे थोडक्यात स्वरूप काय आहे; तदनुषंगाने वन्यजीव संरक्षण कायद्यासह अन्य काही कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२७-०४-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणाची चौकशी पूर्ण झालेली असून, चौकशी समितीकडील अहवालाचे थोडक्यात स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

• तक्रारदार यांनी सोशल मिडियावरील प्रतिमेच्या आधारे परदेशी नागरिकांद्वारे वन्यजीवाचे हाताळणे, वैद्यकीय मदत, उपचार व वाहतूक यामध्ये सहभाग घेतल्याबाबत तक्रार केली होती. परंतु RESQ CT यांनी सादर केलेल्या प्रतिमामध्ये नोंदणीकृत पशुवैद्यक सोबत असल्याचा पुरावा दिला आहे. त्यावरुन स्वयंसेवक नोंदणीकृत पशुवैद्यक सोबत वन्यजीव हाताळत असल्याचे किंवा नोंदणीकृत पशुवैद्यकांना मदत करत असल्याचे आढळून येत आहे.

• वन्यजीव संरक्षण अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन झाले असल्याचे कोणतेही ठोस पुरावे सादर करण्यात आलेले नाहीत. तसेच RESQ CT द्वारे सादर करण्यात आलेले स्पष्टीकरण लक्षात घेता वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ च्या वनविभागाच्या कायदेशीर उल्लंघनाचा ठोस पुरावा आढळून आलेला नाही.

• RESQ ट्रस्टने असे स्पष्ट केले आहे की, नऊ पूर्णवेळ वन्यजीव पशुवैद्यक हे राज्य पशुवैद्यकीय परिषदेकडे नोंदणीकृत असून त्यांची संख्या करारानुसार निश्चित किमान संख्येपेक्षा अधिक आहे. टीटीसी मधील सर्व वैद्यकीय कार्ये, उपचार योजना आखणे, शस्त्रक्रिया करणे, भूल देणे, औषधांचे प्रिस्क्रिप्शन देणे तसेच वन्यप्राण्यांचे पुनर्वसन व मुक्तता यासंबंधी निर्णय घेणे ही केवळ पशुवैद्यकांचीच जबाबदारी आहे. स्वयंसेवकांकडून पुरक स्वरुपाची देखरेखी खालील व सहाय्यक स्वरुपाची मदत दिली जात असल्याचे प्रथमदर्शनी उपलब्ध पुराव्यानुसार आढळून येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैजापूर रीट (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) गावानजीक पट्टेदार वाघाचा मृतदेह आढळून आल्याबाबत

**(१८) ६६८५ (२५-०३-२०२६) श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू मुरपाड ग्रामपंचायतींतर्गत येणाऱ्या वैजापूर रीट (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) गावानजीक असलेल्या नाल्यात दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पट्टेदार वाघाचा मृतदेह आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, वन्यजीव जंगल सोडून मानवी वस्त्यांच्याजवळ येत असल्याच्या घटना सातत्याने घडत असल्यामुळे वन्यजीव व्यवस्थापनाबाबत वनविभागाच्या कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घटनेचा तपास करून सदर प्रकरणातील दोषींवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२७-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.

मौजे-मुरपाड येथील पाटबंधारे विभाग, पोथरा प्रकल्प मध्ये वन्यप्राणी वाघ मृत अवस्थेत आढळून आल्याने वनगुन्हा क्र.०२२८१/५७०१२, दिनांक ३१/१२/२०२५ रोजी नोंद करण्यात आला. त्यानंतर वन्यप्राणी वाघाची पाहणी करून सदर वाघाला मौजे-सातेफळ वनविभागाचे सर्व्हे क्र.१५१ मध्ये नेऊन पशुवैद्यकीय अधिकारी यांचे चमु तसेच उप वनसंरक्षक, वर्धा सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू व वन्यजीव), वर्धा व इतर कर्मचारी यांच्या समक्ष शवविच्छेदन करुन दहन (अग्नी) देण्यात आली. त्यानंतर मुरपाड येथील वन्यप्राणी वाघ जिथे मृत अवस्थेत आढळून आला तिथे पोलीस विभाग, वर्धा येथील श्वान पथक घटनास्थळावर येवून श्वानास घटना स्थळाचा वास देवून बारकाईने पाहणी केली. परंतु वस्तू उपलब्ध नसल्याने श्वानाचा उपयोग करून घेता आला नाही व त्यांच्या आजु-बाजुच्या शेतीची पाहणी करण्यात आली.

(२) वन्यप्राणी जंगल सोडून मानवी वस्तीजवळ येत असल्याच्या घटना सातत्याने घडत असल्यामुळे वन्यप्राणी वस्त्यांमध्ये येवू नये म्हणून वनविभागामार्फत ट्रप कॅमेरे लावण्यात येतात. कर्मचाऱ्यांची गस्त पथके तयार करून गस्त करण्यात येते. तसेच मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्याकरीता गावामध्ये जावुन मार्गदर्शन करण्यात येते.

(३) सायबर पेट्रोलिंग टिम, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील गावांमधील देशी दारू आणि हातभट्टीचे अड्डे बंद करण्याबाबत

**(१९) ७०८७ (१७-०३-२०२६) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील अनेक गावांमध्ये देशी दारूचे अड्डे आणि हातभट्टी सुरू

असल्याने ते बंद करण्यासाठी कर्जत मधील महिलांनी स्थानिक प्रशासनाला निवेदन दिले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास कर्जत तालुक्यातील देशी दारू व हातभट्ट्याचे अड्डे बंद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) कर्जत पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध गावठी हातभट्टीच्या दारुची निर्मीती, वाहतूक तसेच विक्री होऊ नये याकरीता कर्जत पोलीस ठाण्याकडून सन २०२२ ते मार्च, २०२६ या कालावधीत एकूण २५२ गुन्हे दाखल केले असून त्यात २५२ आरोपींकडून एकूण रुपये ६,७८,७७६/- किंमतीचा माल जप्त/नाश केलेला आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम कलम ९३ प्रमाणे प्रतिबंधक कारवाईचे एकूण ४७ प्रस्ताव करण्यात आले आहेत.
तसेच माणे वदप, गौरकामत या गावाच्या परिसरात सन २०२२ ते मार्च, २०२६ या कालावधीत एकूण १४ गुन्हे दाखल केले असून त्यात १४ आरोपींकडून एकूण रुपये ९३,२५०/- किंमतीचा माल जप्त/नाश केलेला आहे. त्याचप्रमाणे या परिसरात वेळोवेळी छापे मारुन अवैध दारु व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींची माहिती मिळवून कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. तसेच, अवैध दारु विक्री करतांना आढळून आलेल्या व्यक्तींविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय मालमत्ता व यंत्रणांचा चित्रीकरणाकरिता वापर करण्यासाठी परवानगी बंधनकारक करण्याबाबत

**(२०) ८१३५ (२५-०३-२०२६) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात बससारख्या शासकीय मालमत्ता व सार्वजनिक परिवहन यंत्रणांचा चित्रीकरणासाठी परवानगी न घेता व कोणतेही शुल्क न भरता मोफत वापर करण्यात आल्याची व एक प्रसिध्द रील कलाकारास नोटिस बजावण्यात आली असून अशा चित्रीकरणामुळे शासकीय मालमत्तेचे नुकसान, नियमित प्रवासी सेवेत अडथळे तसेच सार्वजनिक परिवहन संस्थेच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बससारख्या शासकीय मालमत्ता व यंत्रणांचा चित्रीकरणासाठी वापर करण्याबाबत परवानगी प्रक्रिया, शुल्क आकारणी, कालमर्यादा व जबाबदाऱ्या याबाबत स्पष्ट मानक कार्यपध्दती (SOP) नसल्यामुळे मनमानी व नियमबाह्य वापर होत असल्याचे आढळून आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारच्या चित्रीकरणामुळे शासकीय मालमत्तेचा व्यावसायिक वापर मोफत होत असून, त्यामुळे शासनाचे संभाव्य महसूलाचे नुकसान होत असल्याचे तसेच सार्वजनिक मालमत्तेचा गैरवापर होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय मालमत्ता व यंत्रणांचा चित्रीकरणासाठी वापर करण्यासाठी परवानगी बंधनकारक करणे, निश्चित शुल्क आकारणी करण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे कडक अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रताप सरनाईक (१२-०६-२०२६) :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) रा.प. विभागांना बसगाड्या/ बसस्थानके/कार्यशाळा इत्यादी येथील दृश्यांचे छायाचित्रीकरण करण्याबाबत क्र. राप/वाह/ वाआ/४६३८, दिनांक ०९/०८/२०११ (परिपत्रक क्र. २७/२०११) व क्र. राप/वाह/वाप्र/वाआ/१२५९, दिनांक ०७/०३/२०१४अन्वये चित्रिकरणाचा दर, छायाचित्रीकरणासाठी देण्यात येणारी गाडी/ गाड्यांचा वापर व चित्रपट, दूरदर्शन आणि व्हिडीओ छायाचित्रिकरण करण्यासाठी दृश्यांचे छायाचित्रीकरणाकरीता शुल्क आकारणी, कालमर्यादा व जबाबदाऱ्या याबाबत रा.प. विभागांना करण्याबाबतच्या सूचना प्रसारित करण्यात आल्या आहेत.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.